महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: एमआयएस-०६१५/सीआर-१३/२०२१/तीन दिनांक:- १४ जुलै, २०२१

**-:प्रसिध्दीपत्रक:-**

**विषय :**- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२० - पदसंख्या व आरक्षणातील बदलाबाबत
**संदर्भ :**-जाहिरात क्रमांक ०५/२०२०

महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील अराजपत्रित, गट -ब संवर्गातील भरतीकरीता दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२० ही नजीकच्या काळात घेण्याचे नियोजित आहे.

२. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ५ मे, २०२१ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार सदर प्रवर्गाचे आरक्षण रद्दबातल ठरविण्यात आल्यामुळे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०२०/प्र.क्र.३२०/१६ब, दिनांक ५ जुलै, २०२१ अन्वये भरतीप्रक्रिया राबविण्यासंदर्भात शासनाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरीता आरक्षित असलेली पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरीत करुन संबंधित परीक्षेची निकाल प्रक्रिया राबविणे क्रमप्राप्त ठरते.

३. प्रस्तुत दिनांक ५ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींच्या आधारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता आरक्षित पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरित केल्यानंतर विषयांकित महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२० मधून भरावयाच्या एकूण ८०६ पदांचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१.१ सामान्य प्रशासन विभाग :-** | | | | | | | | | | | | |
| **सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) (एकूण ६७ पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ११ | ५ | -- | २ | १ | २ | १२ | ३ | ७ | ४३ | २४ | ६७ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ७ | ४ | -- | १ | १ | १ | ७ | २ | ५ | २८ | १६ | ४४ |
| महिला | ३ | १ | -- | १ | -- | १ | ४ | १ | २ | १३ | ७ | २० |
| खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | २ | १ | ३ |
| दिव्यांग | एकूण पदे ३ - (१) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू-२ (२) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी-१ | | | | | | | | | | | |
| **१.२ वित्त विभाग :-** | | | | | | | | | | | | |
| **राज्य कर निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) (एकूण ८९ पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १३ | ६ | १ | १ | ६ | १ | १६ | -- | ९ | ५३ | ३६ | ८९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ८ | ४ | १ | १ | ४ | १ | १० | -- | ६ | ३५ | २२ | ५७ |
| महिला | ४ | २ | -- | -- | २ | -- | ५ | -- | ३ | १६ | ११ | २७ |
| खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | २ | २ | ४ |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| दिव्यांग | एकूण पदे ४ - (१) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू-२ (२) श्रवण शक्तीतील दोष-१ (३) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी-१ | | | | | | | | | | | |
| **१.३ गृह विभाग :-** | | | | | | | | | | | | |
| **पोलीस उप निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) (एकूण ६५० पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ८५ | २४ | २०+९* | १६+१४* | २ | -- | १२४+१८* | १३ | ६५ | ३९० | २६० | ६५० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ५६ | १६ | १९ | १९ | १ | -- | ९२ | ८ | ४३ | २५४ | १६३ | ४१७ |
| महिला | २५ | ७ | ९ | ९ | १ | -- | ४३ | ४ | १९ | ११७ | ७८ | १९५ |
| खेळाडू | ४ | १ | १ | २ | -- | -- | ७ | १ | ३ | १९ | १३ | ३२ |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ६ | ६ |
| *** अनुशेषाची पदे** | | | | | | | | | | | | |

४. उपरोक्त पदसंख्येच्या आधारे विषयांकित महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२० करीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

५. दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

ठिकाण: मुंबई

सहसचिव, परीक्षापूर्व<br>महाराष्ट्र लोकसेवा आयोग